सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, डिसेंबर २, २००५/अग्रहायण ११, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत .

# भाग दोन

## ठाणे शहर महानगरपालिका, ठाणे

### अधिसूचना

क्रमांक ठामपा/आयुक्त/जकात/१७९१

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

शासन निर्णय क्रमांक ठामपा/२००४/१७८७/प्रक्र. ८७/२००४ नवि २३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ ऑक्टोबर २००५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) चे कलम १४९ पोट-कलम (१) कलम १२७ चे पोट-कलम (२), खंड (अ) आणि कलम ४५५ व कलम ४५७ च्या खंड (७) चा पोटखंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्याबाबत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ठाणे महानगरपालिका जकात नियम, १९९९ मध्ये दुरूस्ती व सुधारणा करणेच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार कलम ४५५ चे पोट-कलम (२) द्वारे **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करणे आवश्यक असल्याने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नवीन नियम क्र. ४ अ .**—(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतीत नोंदणीकृत धर्मादाय संस्थाकडे अपंग/गरीब/गरजुंना मोफत वाटपासाठी देणगी म्हणून आयात होणाऱ्या मालावर मा. महापौर/मा. स्थायी समिती सभापती यांचे शिफारशींनुसार आयुक्तांचे मान्यतेने आवश्यक त्या अटींवर जकात माफी देता येईल.

(२) धार्मिक किंवा सार्वजनिक कार्यक्रमासाठी तात्पुरते भाड्याने आयात केलेले मंडप/डोकोरेशन व तत्सम साहित्य यावर आवश्यक त्या अटीवर जकात प्रमुखांचे मान्यतेने जकात माफी परवानगी देता येईल.

(३) एखादे मशिन/उपकरण/वस्तू विशिष्ट कामासाठी/जॉबवर्क करण्यासाठी हद्दीतून अथवा हद्दीबाहेर वारंवार ने-आण करण्याकरिता सदर मशिन/उपकरण/वस्तू वर एकवेळ जकात वसूल करून तसेच जकातीएवढी अनामत घेऊन आवश्यक त्या अटीवर जकात प्रमुखांचे मान्यतेने ने-आण करणेची परवानगी देता येईल.

**नवीन नियम क्र. २३ अ .**—प्रक्रियेसाठी महापालिका हद्दीत माल आयात करणाऱ्या आयातिकांकडून नियम २३ (४) नुसार मालाचे प्रत्येक आयातीचे वेळी जकातीएवढी अनामत घेऊन नियमानुसार परतावा देणऐवजी महापालिका ठरावाद्वारे वेळोवेळी ठरविल त्या सवलतीच्या दराने जकात वसूल करता येईल. अशा सवलतीच्या दराने भरलेल्या जकातीचा परतावा देय असणार नाही. तसेच अशी सवलत कायम अनामत भरून पूर्वपरवानगी असलेल्या आयातिकांनाच लागू असेल. सदर सवलतीचा दर प्रक्रियेसाठी आयात मालावर अनुसूची दराने होणाऱ्या जकातीच्या १०% पेक्षा कमी किंवा देय होणाऱ्या जकातीच्या ५०% पेक्षा जास्त नसावा. तथापि, सर्व्हीसिंगसाठी येणाऱ्या वाहनांना ही कमाल व किमान मर्यादा लागू होणार नाही. मात्र प्रचलित दरापेक्षा कमी सर्व्हीस चार्ज वसूल करता येणार नाही.



[किंमत : रुपये २०.००]

**नवीन नियम क्र. २३ ब.**—जकात अधिकाऱ्यांचे पूर्वपरवानगीनुसार दुरूस्ती किंवा प्रक्रियेसाठी माल/मशिन सुटे भाग हद्दीबाहेर पाठवून दुरूस्ती/प्रक्रिया होऊन सदर माल/मशिन सुटे भाग त्यांचे निर्यातीपासून सहा महिन्यांचे आत फेर आयात होताना फक्त वाढीव मूल्यांवर/प्रक्रिया मूल्यावर (लेबर चार्ज + वाहतूक खर्च + इतर अनुषंगिक खर्च यावर) जकात भरण्याची परवानगी आवश्यक त्या अटी/शर्तीवर देता येईल.

**नवीन नियम क्र. २३ क.**—नियम क्रमांक २३ (४) नियम क्रमांक २३ (अ) नियम क्रमांक २३ (ब) चे तरतुदीनुसार जकात सवलत ही प्रक्रियेनंतर मालाचे मूळ स्वरूप आकारमान स्थिती यामध्ये विशेष करून बदल होणार नाही या शर्तीस अधिन राहून लागू राहील. याबाबत स्थायी आदेशान्वये प्रक्रियांची यादी निश्चित करता येईल. तसेच सदर यादीतील किंवा यादी व्यतिरिक्त वाढीव प्रक्रियेत सवलत देण्याबाबत तसेच प्रक्रियेनंतर मालाचे मूळ स्वरूप यामध्ये विशेष बदल होतो किंवा नाही याबाबत आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

**नवीन नियम क्र. २३ ड.**—आयातिकास जो माल त्वरित निर्यात करण्याचे उद्देशाने महापालिका हद्दीत आयात करावयाचा आहे. परंतु, सदर मालाचे बिजक/चलने/बिल ऑफ एंट्रीज हे महापालिका हद्दीतील संस्था/कंपनी यांचे नावे असेल तेव्हा सदर आयातिकांकडून अनुसूची दराने होणाऱ्या जकातीच्या १० टक्के सर्व्हीस चार्ज धरून खास मार्गस्थ संरक्षणाखालील सदरचा माल हद्दीबाहेर पाठविता येईल. मात्र सदर माल कंपनीत नेऊन निर्यात करावयाचा असल्यास नियम २३ (१) तसेच संबंधित तरतुदी लागू होतील.

**नवीन नियम क्र. २३ इ.**—ठाणे महानगरपालिका (जकात) नियम, १९९९ मधील अनुसूची एक मधील अ.क्र. ६क. ३५, ४०, ६४, ६५, ७०, ७१, ७७ मध्ये नमूद केलेला माल एखाद्या कारखान्याचे उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून आयात करताना त्यावर अनुसूची एक मधील प्रचलित दराऐवजी ५०% सवलतीच्या दराने जकात आकारणीबाबत खालील अटीवर तसेच आवश्यक त्या शर्तीवर कारखान्यात उत्पादनासाठी आयात करण्यास आयुक्तांचे मान्यतेने परवानगी देता येईल. मात्र सदर सवलतीचा दर हा १.५०% पेक्षा कमी असणार नाही.

तसेच, ठाणे महानगरपालिका हद्दीत नवीन उद्योग सुरू करणाऱ्या कारखान्यांना सदर सवलत कारखाना सुरू केल्यापासून तीन वर्षांकरिता अनुसूची एक मधील सर्व प्रकारचे कच्च्या मालाकरिता लागू असेल. मात्र एकाच ठिकाणी एकदा जकात सवलत घेऊन उद्योग बंद केल्यास त्याच कारखान्यात अथवा त्याच मालकास त्याच नावाने अथवा दुसऱ्या नावाने पुन्हा उद्योग सुरू केल्यानंतर सदर जकात सवलत पुन्हा लागू होणार नाही.

**अटी.**—१. उपरोक्त तरतुदीनुसार सवलतीच्या दराने आयात कच्च्या मालाचा खप/वापर स्वतःचे उत्पादनासाठी केला पाहिजे. सदर कच्चा मालावरील उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया सवलत घेतलेल्या कारखान्यातच केल्या पाहिजेत.

२. उपरोक्त तरतुदीनुसार सवलतीच्या दराने आयात कच्चा माल दुसऱ्या कारखान्याकडे प्रक्रियेसाठी पाठविता येणार नाही. तसेच त्याची विक्री करता येणार नाही. अथवा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ त्याची विल्हेवाट लावता येणार नाही.

## नवीन नियम क्रमांक २३ (इ) १

### आजारी उद्योग

**व्याख्या.**—आजारी उद्योग म्हणजे केंद्र व राज्य शासन निर्णयानुसार अथवा भारतीय रिझर्व बँकेने घोषित केलेले उद्योग.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्रांचे शासन निर्णयानुसार जे उद्योगधंदे आजारी उद्योग म्हणून घोषित असतील, अशा आजारी उद्योगधंद्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांनी आयात केलेला कच्चा माल यावर सदरचा नियम अस्तित्वात आल्यापासून पहिल्या ५ वर्षांच्या मुदतीसाठी खाली निर्देशित निकष व दराप्रमाणे जकात आकारणी करण्यात येईल :—

**निकष.**—(१) संबंधित आजारी लघुउद्योगाला वित्तीय सहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्था/बँक यांनी बनविलेल्या पुनरुज्जीवित योजनेत राज्य शासनातर्फे शुश्रुषा कार्यक्रमाअंतर्गत सोयी सवलती देण्यात येतात. उदा. विक्रीकर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडनीय व्याज इत्यादींसह जी एकूण रक्कम होईल ती सर्व रक्कम थकबाकी म्हणून आली असेल व आजारी उद्योगाने ही संपूर्ण रक्कम जास्तीत जास्त ३६ मासिक हप्त्यांमध्ये १३% वार्षिक व्याजाने परतफेड मान्य केलेले असेल तरच संबंधित उद्योग जकात सवलतीस पात्र असतील.

(२) आजारी औद्योगिक घटकाला वित्तीय सहाय्य करणाऱ्या बँक/वित्तीय संस्थांनी संबंधित आजारी उद्योग घटकाकरिता शुश्रुषा कार्यक्रमाअंतर्गत पुनरुज्जीवन योजनेचा प्रस्ताव त्यामध्ये योजना सुरू होणाऱ्या दिनांकासह योजनेचा कालावधी नमूद करून संबंधित उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक/जिल्हा उद्योग केंद्राच्या अधीक्षकाची उद्योग अधिकाऱ्यांकडे सादर करावा.

(३) महाव्यवस्थापक/जिल्हा उद्योग केंद्राच्या अधीक्षकीय यांचेकडून संबंधित औद्योगिक घटकाने आजारी उद्योग प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

(४) आजारी उद्योग प्रमाणपत्रांची प्रत महानगरपालिकेमध्ये सादर करणे बंधनकारक राहील व त्याप्रमाणे पुढे नमूद केल्याप्रमाणे जकात सवलत मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने देता येईल :—

| प्रचलित दर | एकूण जकातीच्या | सवलत |
|---|---|---|
| (अ) पहिल्या वर्षी | २०% | ८०% |
| (ब) दुसऱ्या वर्षी | ४०% | ६०% |
| (क) तिसऱ्या वर्षी | ६०% | ४०% |
| (ड) चौथ्या वर्षी | ८०% | २०% |
| (इ) पाचव्या वर्षी | ९०% | १०% |

## नवीन नियम क्रमांक २३ इ (२)

### नवीन उद्योग

**विषय :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने प्रस्थापित होणाऱ्या उद्योगास प्रोत्साहन देणेसाठी सवलतीबाबत.

महापालिकेच्या क्षेत्रात नवीन उद्योगधंद्याची उभारणी व्हावी हा हेतू समोर ठेवून उद्योगाच्या मालकीचा आयात केलेल्या कच्चा माल यावर सदरचा नियम अस्तित्त्वात आल्यापासून पहिल्या ५ वर्षांच्या मुदतीसाठी खाली निर्देशित केलेल्या अटी/शर्ती व दराप्रमाणे जकात आकारण्यात येईल :—

**शर्ती व अटी.**—(१) मा. महाराष्ट्र शासनाकडील उद्योग खात्यांकडे लघु उद्योगधंद्याची नोंदणी करणे आवश्यक राहील.

(२) ठाणे शहर हद्दीलगतच्या औद्योगिक वसाहत व औद्योगिक भाग वगळून शहर हद्दीबाहेरील इतर ठिकाणाहून प्लॅन व मशिनरी आयात केल्याशिवाय सुरू झालेल्या नवीन उद्योग धंद्याना ही सवलत मिळणार नाही.

(३) नवीन उद्योगाने कच्च्या मालाचा खप/वापर स्वतःचे उत्पादनासाठी केला पाहिजे. सदर कच्च्या मालावरील उत्पादनांच्या सर्व प्रक्रिया सवलत त्याच कारखान्यात केल्या पाहिजेत.

(४) एकदा जकात सवलत घेऊन उद्योग बंद केल्यास त्याच कारखान्यात अथवा उद्योग मालकास त्याच किंवा दुसऱ्या नावाने पुन्हा उद्योग सुरू केल्यानंतर सदर जकात सवलत पुन्हा लागू असणार नाही.

(५) जर एखाद्या कारखानदाराने सदरच्या सवलतीचा दुरूपयोग केल्याचे आढळून आल्यास मा. आयुक्त कोणतीही पूर्वसूचना न देता ही सवलत काढून घेतील.

(६) नवीन उद्योगात सवलतीच्या दराने आयात कच्चा माल दुसऱ्या कारखान्याकडे प्रक्रियेसाठी पाठविता येणार नाही. तसेच त्यांची विक्री करता येणार नाही अथवा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ त्याची विल्हेवाट लावता येणार नाही :—

| जकात आकारणी सवलत | एकूण जकातीच्या | सवलत |
|---|---|---|
| (१) पहिल्या वर्षी | १०% आकारणी | ९०% |
| (२) दुसऱ्या वर्षी | २०% आकारणी | ८०% |
| (३) तिसऱ्या वर्षी | ४०% आकारणी | ६०% |
| (४) चौथ्या वर्षी | ६०% आकारणी | ४०% |
| (५) पाचव्या वर्षी | ८०% आकारणी | २०% |

**नवीन नियम क्रमांक २३ इ (३)**

**विषय :** महापालिका क्षेत्रामध्ये अस्तित्त्वात असलेल्या उद्योगाने त्या अंतर्गत नवीन प्रकारची उभारणी केल्यास प्रोत्साहन देणेसाठी सवलत देण्याबाबत.

महापालिकेच्या क्षेत्रात अस्तित्त्वात असलेल्या उद्योगांमध्ये जादा युनिट सुरू केल्यास, सदर उद्योगाच्या मालकीच्या आयात केलेला कच्चा माल यावर सदरचा नियम अस्तित्त्वात आल्यापासून पहिल्या ५ वर्षांच्या मुदतीसाठी खाली निर्देशित केलेल्या अटी/शर्ती सदराप्रमाणे जकात आकारण्यात येईल :—

**शर्ती व अटी.**—(१) मा. महाराष्ट्र शासनाकडील उद्योग खात्यांकडे वाढीव उद्योग धंद्याची नोंदणी करणे आवश्यक राहील.

(२) विस्तारित उद्योगासाठी रीतसर बांधकाम परवानगी महापालिकेकडून घेणे आवश्यक राहील.

(३) ठाणे शहर हद्दीलगतच्या औद्योगिक वसाहत व औद्योगिक भाग वगळून शहर हद्दीबाहेरील इतर ठिकाणांहून प्लॅंट व मशिनरी आयात केल्याशिवाय सुरू झालेल्या वाढीव उद्योगांस ही सवलत मिळणार नाही.

(४) आयात केलेल्या कच्च्या मालाचा वापर खप/वापर स्वतःचे उत्पादनासाठी केला पाहिजे. कच्च्या मालावरील उत्पादनांच्या सर्व प्रक्रिया सवलत त्याच कारखान्यात केल्या पाहिजेत.

(५) वाढीव उद्योगांचे प्राप्त सवलतीचा दुरुपयोग केल्याचे आढळून आल्यास मा. आयुक्त कोणतीही पूर्वसूचना न देता सदरची सवलत काढून घेतील.

(६) वाढीव उद्योगात सवलतीच्या दराने आयात कच्चा माल दुसऱ्या कारखान्यांकडे प्रक्रियेसाठी पाठविता येणार नाही. तसेच त्यांची विक्री करता येणार नाही अथवा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ त्यांची विल्हेवाट लावता येणार नाही.

| जकात आकारणीची सवलत | | आकारणी | सवलत |
|---|---|---|---|
| (१) पहिल्या वर्षी | .. | १०% | ९०% |
| (२) दुसऱ्या वर्षी | .. | २०% | ८०% |
| (३) तिसऱ्या वर्षी | .. | ४०% | ६०% |
| (४) चौथ्या वर्षी | .. | ६०% | ४०% |
| (५) पाचव्या वर्षी | .. | ८०% | २०% |

**नियम २३ (इ) (४).**—शासनाच्या उद्योग व ऊर्जा मंत्रालयाने माहिती व तंत्रज्ञान उद्योगांसाठी जकात करात सवलत देणेबाबत दिनांक १२ जुलै २००३ चे शासन निर्णयान्वये निर्णय घेतलेला आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान उद्योगांकडे येणाऱ्या भांडवली यंत्रसामुग्रीवर व कच्च्या मालावर/जकात माफी देण्यात येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही व अटी राहतील :—

(१) उद्योगधंद्याचे माहिती तंत्रज्ञान या वर्गवारीमध्ये शासनाकडे नोंदणी आवश्यक.

(२) या सवलतीसाठी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करून सवलत परवानगी घ्यावी लागेल.

(३) खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री व कच्चा माल हा स्वतःच्या वापराकरिता उपयोगात आणण्यात येईल व कोणालाही विकण्यात येणार नाही. असे प्रतिज्ञापत्र नाक्यावर माल आयात करताना सादर करणे आवश्यक राहील.

(४) उद्योजकाने वार्षिक अभिलेख महानगरपालिकेकडे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

**ठाणे महानगरपालिका जकात अनुसूची एक मध्ये करावयाच्या सुधारणा**

| अनुक्रमांक | मालाचे वर्णन | मुल्यानुसार | | अन्यथा विनिर्दिष्ट केले नसेल तर प्रत्येक १० किलोमागे. | |
|---|---|---|---|---|---|
| | | कमाल दर | किमान दर | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | टक्के | टक्के | रु. | रु. |
| १८ | नारळ (१०० नगास) | ... | ... | १०.०० | ५.०० |

**नवीन नियम ३५ (ड).**—कोणताही इसम जकात पात्र माल प्रवेश जकात नाक्यावरील अधिकाऱ्यांना न दाखविता व त्या मालाची जकात न भरता शहराच्या हद्दीत प्रवेश करील तर त्या मालावरील जकात व जकात कराच्या १० पटीपर्यंत रक्कम आयुक्त अथवा आयुक्ताने प्राधिकृत केलेला जकात अधिकारी वसूल करील.

कोणताही इसम जकात पात्र मालाची जकात नाक्यावर जकात भरतांना जकात वाचविण्याच्या उद्देशाने मालाचे परिमाण, मालाचे मूल्य, कमी दाखवून जकात चुकविल तर त्याने चुकविलेली जकात कराची रक्कम व त्या रकमेच्या १० पटीपर्यंत रक्कम आयुक्त अथवा आयुक्तांनी प्राधिकृत केलेला अधिकारी वसूल करील.

ह्या मालावरील जकात व दंडनीय रकमेचा भरणा होईपर्यंत हा माल आयातिकाच्या जबाबदारीवर महापालिकेच्या गोदामात राहील. या व्यतिरिक्त आयातिक जकात चुकविल्याबद्दल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ३९८ अनुसार कारवाईस पात्र राहील.

**नमुना १७**

(नियम २३ इ)

[नियम २३ (इ) नुसार पूर्वपरवानगी घेतलेल्या आयातिकाने शुल्क पात्र माल आपल्या औद्योगिक उपक्रमासाठी कच्चा माल म्हणून आयात करतांना प्रवेश जकात नाक्यावर जकात सवलतीसाठी द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.]

मी ............................................................... याद्वारे असे प्रतिज्ञापत्र करतो की, नियम १३ अन्वये ज्या मालाचे संबंधास मी वेगळे प्रतिज्ञापन केलेले आहे, तो माल माझ्या औद्योगिक उपक्रमात म्हणजे ................................................ यांस (येथे उपक्रमाचे संपूर्ण नाव व पत्ता) ..................................... निर्माण करतांना वापरावयाचा कच्चा माल म्हणून मी आयात केलेला आहे आणि अशा मालावर अनुसूची एक नुसार सर्वसाधारण दराने देय असलेली जकात व ठाणे महानगरपालिका (जकात) नियम, १९९९ याच्या नियम २३(इ) अन्वये सवलतीच्या दराने दिलेली जकात यामधील फरक अगोदर भरल्याशिवाय मी कोणत्याही इतर प्रयोजनार्थ अथवा विक्री करण्यासाठी त्या मालाचा वापर करणार नाही किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे प्रयोजनासाठी कोणत्याही इतर व्यक्तीला देऊन त्याची विल्हेवाट लावणार नाही. तसेच परवानगी पत्रातील अटींचे पूर्ण पालन करीन.

दिनांक

आयातिकाची सही

शिक्का

**टीप.**—हे प्रतिज्ञापन नमुना १ मधील संबंधित प्रतिज्ञापनाशी सुरक्षितपणे जोडण्यात आले पाहिजे.

**संजय सेठी,**
आयुक्त,
ठाणे, महानगरपालिका, ठाणे.

ठाणे, दिनांक १ डिसेंबर २००५.

# THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

## *NOTIFICATION*

No. TMC/Commissioner/Octroi-1791.

BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949.

No. Govt. Resolution No. TMC. 2004/1787/87/2004, नवि-२३, Mantralaya, Mumbai dated 15th October 2005 in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 149 read with clause (*a*) of sub-section (*2*) of sections 127, 455 and sub-clause (*c*) of clause (*7*) of section 457 of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 (Bom. LIX of 1949) with the sanction of the State Government as required by sub-section (*2*) of Section 149 of the said Act, hereby makes the following rules, the same having been previously published as required by sub-section (*2*) of said section 455 for Thane Municipal Corporation (Octroi) Rules, 1999, Amendment.

*New Rules No. 4-A* .—(1) Waiver of octroi-duty may be granted, subject to condition as may be required with the approval of the Municipal Commissioner, on the recommendation of the Honourable Mayor / Hon'ble Standing Committee, on the goods imported within the limits of the Thane Municipal Corporation by the registered Charitable Institutions for free distribution by way of gifts to the disabled/poor/needy persons.

(2) Permission to waive octroi-duty may be granted, with the approval of the Octroi Chief on required condition on Mandap/decoration and similar goods hired temporarily for religious or public programmes.

(3) For bringing in or taking out any machine/device/article frequently within or without the limits of the Thane Municipal Corporation, permission to such inward or outward movement may be granted with the approval of the Octroi Chief on the required conditions, on recovering Octroi for once and also on accepting a sum equal to the sum of the octroi as deposit.

*New Rules No. 23-A.*—Octroi at a concessional rate, as may be fixed by the Municipal Corporation by resolutions passed from time to time, may be recovered from the importers importing goods within the limits of the Thane Municipal Corporation for the purpose of processing instead of accepting deposit of a sum equal to the octroi duty at the time of every import and later on granting refund as per the rules. The octroi-duty so paid at the concessional rates shall not be refundable.

The concessional rate of octroi on the goods imported for processing shall not similarly be less than 10% or more than 50% of the amount of octroi computed at the scheduled rates on such goods. This maximum and minimum limit shall not, however, be applicable to the vehicles being brought in for servicing. However, service charge shall not be recovered at a rate less than the prevalent rate.

*New Rules No. 23-B.*—When goods/machine/spare parts are sent out of the Municipal Corporation limits with the prior permission of the Octroi Officer for repairing or processing, and are to be reimported within the Municipal Corporation limits within a period of six months from their export after repairs/ processing permission to pay octroi at the time of their reimport on added value/processing value (Labour Charge + Conveyance + Other Incidental Charges) only may be granted on required terms and conditions.

*New Rules No. 23-C.*—Concession in Octroi under the provision of the rules No. 23(4), 23-A, and 23-B shall be applicable subject to the condition that there shall not be any material change in the original nature, volume, condition of the goods. A list of processes may be prescribed in this respect by a Standing Order. Similarly, the decision of the Municipal Commisioner, in respect of granting concession in processing in the list or in excessive processing over and above the list and also in respect of whether or not the goods undergo any material change in its original nature after the processing, shall be final.

*New Rules No. 23-D.*—When an importer has to import the goods within the limits of the Municipal Corporation with an intention to export the same forthwith but the invoice/challan/bill of entries pertaining to the said goods are in the name of an organisation/company within the limits of the Thane Municipal Corporation, the said goods may be sent out of the Municipal Limits under special escort protection after recovering service charge equal to 10 percent of the octroi duty at the scheduled rates from the importers. But, however, the provisions of the rule 23(1) shall apply if the said goods are to be taken to the company first and then exported.

*New Rules No. 23-E.*—The goods mentioned in Schedule 'I' against a, c, 6c, 35, 40, 64, 65, 70, 71, 77 when being imported as raw materials for any factory permission to charge 50% concessional rate of octroi, may be granted with approval of the Municipal Corporation instead of the prevalent rate in Schedule 'I' on the following condition and the required terms to import for production in the factory. However, the said concessional rate shall not be less than 1.50%.

The factories commissioning new industries within the Thane Municipal Corporation limits shall avail of the said concession on all sorts of goods mentioned in Schedule 'I' for a period of three years from the commissioning of the factory. But where a factory owner avails of the concession at one place and closes down the industry and recommissions the same in the same factory either in the name of the same owner or in someone else's name, the said concession in octroi duty shall not be applicable again.

*Condition* :—(1) As per the aforsaid provisions the consumption/utilization of the raw material imported at concessional rate must be for his own production. All the processes of production on the said raw material must be carried out in the very same factory for which concession has been availed.

(2) As per the abovesaid provision, the raw material imported at concessional rate, shall not be sent to another factory for processing. Similarly, the same shall not be sold nor can the same be disposed of for any other purpose.

## NEW RULES No. 23-E (I)

### SICK UNITS

*Definition.*—Sick units mean such units as are either as per the decision of the Central or the State Government or the industries declared by the Reserve Bank of India.

As per the Government Resolution pertaining to the Thane Municipal Corporation limits, for encouraging the industries declared as sick units, octroi duty shall be levied on the raw materials imported by such units on the following criteria and rates for a period of 5 years from the date said rule came into existence.

*Criteria* :—(1) Under the reinvention scheme framed by the Financial Institutions/Banks assisting the sick units concerned, concessions under the treatment programme are being granted by the State Government. For example, if the total sum of Sales Tax, original amount of arrears of the Maharashtra State Electricity Board, interest and penal interest has been taken as arrears and if the sick units undertake to repay the entire sum at 13% annual interest in not more than 36 monthly instalments, then and then above, the unit concerned shall be eligible to avail of the octroi concession.

(2) The Banks/Financial Institutions assisting the sick industrial units should submit the proposal for the reinvention scheme under the treatment programme for the sick industrial unit concerned mentioning therein the date of the commencement of the scheme, duration of the scheme to the General Manager of the Industrial Centre concerned / Superintending Industries Officer of the District Industrial Centre.

(3) It shall be essential for the Industrial Unit concerned to obtain the sick unit certificate from the General Manager/Superintending Officer of the District Industrial Centre concerned.

(4) It shall be binding to produce a copy of the sick unit certificate in the Municipal Corporation and concession in octroi as mentioned hereunder may be granted with the approval of the Hon'ble Municipal Commissioner.

| Prevalent Rate | Percentage to the total octroi | Concession |
|---|---|---|
| (a) First Year | 20% | 80% |
| (b) Second Year | 40% | 60% |
| (c) Third Year | 60% | 40% |
| (d) Fourth Year | 80% | 20% |
| (e) Fifth Year | 90% | 10% |

## NEW RULE NO. 23-E (2)

## New Industries

**Sub.**— Regarding concessions to be offered to promote the industries being set up newly in the Thane Municipal Corporation area.

With a view to establishing new industries within the Thane Municipal Corporation area, Octroi duty on the terms and condition and at the rates stipulated underneath shall be levied on the raw materials owned and imported by the newly set up industries for a period of first five years from the coming the said rule into existence.

*Terms and Condition* .—(1) It shall be essential for the small scale industries to register with the Industries Department of the Government of Maharashtra.

(2) This concession shall not be available to the new industries commissioned without importing the plant and machinery from any place outside the limits of the Industrial Estates and Industrial parts adjacent to the limits of the Thane City.

(3) The new industry shall consume / utilize the raw materials for its own production. All the processes of the production on the said raw materials shall be carried out in the same factory for which concession is availed of.

(4) On closure of an industry which has availed of the octroi concession one, if the industry is restarted in the same factory or in the name of the same owner or in any one elses name, the octroi concession shall not be available again.

(5) If any factory owner is found to be misusing the said concession the Hon'ble Municipal Commissioner shall withdraw the said concession forthwith without giving any prior notice.

(6) The raw materials imported by the new industries at a concessional rate shall not be sent to any other factory for processing. Similarly, neither shall it be sold nor disposed of in any other way.

| Concession in Octroi recovery | Levy as per centage to total octroi | Concession |
|---|---|---|
| (1) First Year | 10% | 90% |
| (2) Second Year | 20% | 80% |
| (3) Third Year | 40% | 60% |
| (4) Fourth Year | 60% | 40% |
| (5) Fifth Year | 80% | 20% |

*New Rule No. 23-E(4)* .—The Ministry for Industries and Energy of the Government has decided to grant concessions in the octroi duty to the information and technology industries in its Resolution dated 12th of July 2003.

Waiver of the octroi duty shall be granted on the capital machinery and the raw materials coming to the Information and Technology industries within the Thane Municipal Corporation limits. The terms and conditions and the procedure therefor, shall be as follows :—

1. The registration of the industry under the category of Information and Technology with the Government is essential.

2. Application for this concession shall be submitted to the Municipal Corporation and its permission obtained.

3. The machinery and the raw materials purchased shall be utilized for one's own purpose and an affidavit to the effect that the same shall not be sold to any one else shall be submitted at the 'NAKA' at the time of importing the good.

4. It shall be essential for the industrialist to submit the annual record to the Municipal Corporation for examining.

The amendments to be carried out in the octroi Schedule No. 1 of the Thane Municipal Corporation.

| Sr. No. | Description of the goods | Ad valorem | | Per every 10 kgs. unles otherwise specified | |
|---|---|---|---|---|---|
| | | Rate Max. | Rate Min. | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | Rs. | Rs. |
| 18 | Coconuts (per every 100 pieces) | per cent | per cent | 10.00 | 5.00 |

*New Rules 35 d*.—(1) In case any person enters into the limits of the city with octroi chargeable goods without bringing the same to the notice of the officers at the octroi post or without having paid the duty on the said goods. The Municipal Commissioner or the octroi officer authorised by the Municipal Commissioner shall recover from the said party the octroi duty and a sum ten times the octroi duty.

In case, any person while paying the octroi duty at the octroi post shows either the volume or value of the said goods less with a view to same duty, and thus evode the octroi duty, the Municipal Commissioner or the Officer authorizes by the Municipal Commissioner shall recover from him the amount of the octroi duty evaded by him and an amount ten times of the said sum, till the time such octroi duty on the said goods and the penal amount got paid up the goods in quotation shall lie in the Municipal godown at the right of the importer. In addition, the importer shall also be liable for action under section 398 of the Mumbai Provincial Municipal Corporation Act. 1949.

## FORM - 17

(Rule 23-E)

*[Affidavit to be submitted by an importer, who has obtained prior permission under Rule 23 E, at the Octroi 'NAKA' at the time of importing dutiable goods as raw material for his industrial undertaking for the octroi concession.]*

I, ______________________________ do, hereby, declare that I have imported the goods in respect of which I have made a separate declaration under rule 13, for using the same as raw material in my industrial undertaking i.e. ______________________________ (full name and address of the undertaking) in the production of ______________ and that before first paying the difference between the octroi duty payable on such goods at the normal rate as per Schedule 1 and the octroi duty paid at the concessional rate under rule 23(E) of the Thane Municipal Corporation (Octroi) Rules, 1999, 'I' shall not use the said goods for any other purpose or for selling or dispose of the same by giving to some one else for any other purpose. And that I shall fully comply with the condition stipulated in the letter of permission.

Date : Signature of the Importer

Stamp

*Note*.—This affidavit must be securely attached to the affidavit in Form 1.

SANJAY SETHI,
Commissioner,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane, dated 1st December 2005.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई